नगरपालिका,महानगरपालिका,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे आस्थापित करण्यासाठी अर्थसहाय्याची योजना

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.अपाऊ २०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :१३ जानेवारी,२०११.

प्रस्तावना -

राज्यात पाणी पुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये अनुक्रमे एकूण ४ टक्के व १.५ ते २ टक्के ऊर्जा वापर होतो. त्यामध्ये सुमारे ३० टक्के ऊर्जा बचतीस वाव असून, त्यासाठी ऊर्जा बचत उपकरणांचा वापर त्वरित सुरु करणे आवश्यक आहे. अशी ऊर्जा बचत सयंत्रे उपलब्ध देखील आहेत. राज्यातील बऱ्याच नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये हाताने पथदिवे सुरु व बंद करण्यात येत असल्याने ऊर्जेचा अपव्यय होतो. त्याएवेजी ॲटो सेन्सर, व्होल्टेज डिमिंग तंत्र, टायमर, स्काडा, वेब बेस्ड मॉनिटरींग सिस्टीम वापरुन ऊर्जा बचत तसेच सुविधाजनक होऊ शकते. अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर पथदिव्यांप्रमाणेच पाणीपुरवठा योजनांमध्येही केल्यास पाणी पुरवठा पंपाची संख्या,त्यांची कार्यक्षमता व पाण्याचे परिमाण दर्शविणारी यंत्रणा बसविल्यास पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता वाढविणे शक्य आहे.

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकांकडील पथदिवे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पाणी पुरवठा योजना यामध्ये मॉनिटरींग करणारी व ऊर्जा कार्यक्षमता दर्शविणारी यंत्रणा वापरुन ऊर्जा बचत करण्यासाठी पथदर्शी स्वरुपात योजना राबविण्याच्यादृष्टीने अर्थसहाय्य देण्याची योजना राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –**

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचत करणारे सयंत्र/ यंत्रणा आस्थापित करुन ऊर्जा बचत करण्यासाठी अर्थसहाय्याच्या योजनेस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. **योजनेची तांत्रिक माहिती व परिमाण –**

नगरपालिका, महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांच्या यंत्रणेमध्ये पंपाची कार्यक्षमता नियमितपणे दर्शविण्यासाठी स्काडा व वेब बेस्ड मॅानिटरींग यंत्रणा आस्थापित करणे आणि पथदिव्यांमध्ये ऑटो सेंसर टाईमर, व्होल्टेज डिमिंग तंत्र, स्काडा व वेब बेस्ड मॅानिटरींग सिस्टिम इत्यादी प्रकारची सयंत्रे आस्थापित करण्याकरिता नगरपालिका, महानगरपालिका, व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांना पथदर्शी स्वरुपात सदरची ऊर्जा बचतीची सयंत्रे प्राधान्याने आस्थापित करण्यासाठी महाऊर्जामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

ब. **अर्थसहाय्य-**

नगरपालिका ,महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना अनुसरुन पथदिव्यांमध्ये विविध सयंत्रे आस्थापित करण्यासाठी कमाल मर्यादा रुपये २० लाखापर्यंत व पाणी पुरवठा योजनांमध्ये पंपाची कार्यक्षमता दर्शविणारी व मॅानिटरींग करणारी सयंत्रे आस्थापित करण्याकरिता कमाल मर्यादा रु. ५ लक्षापर्यंत महाऊर्जामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.सयंत्र आस्थापित करण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी वरीलप्रमाणे अर्थसहाय्य वगळता उर्वरित खर्च संबंधित संस्थेने/ प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. सदर योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना महाऊर्जाकडून निर्गमित करण्यात येतील.

क. **योजनेची अंमलबजावणी -**

१) दरवर्षी प्रत्येक महसूली विभागातून ‘अ’ ‘ब’ व ‘क’ वर्ग नगरपालिकांमधून एक नगरपालिका निवडण्यात येईल. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांनी शिफारस केलेल्या

नगरपालिकांकडून प्रस्ताव महाऊर्जाकडून मागविण्यात येतील. तसेच महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून महाऊर्जाने प्रस्ताव मागवून गुणकांच्याआधारे प्रस्तावांचा विचार करण्यात यावा.

२) नगरपालिका,महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पथदिव्यांचे व पाणी पुरवठा यंत्रणेचे आवश्यकतेनुसार ऊर्जा परीक्षण करुन घेण्यात येईल.

३) सदर सयंत्रे उभारणीसाठीची निविदा प्रक्रिया संबंधित नगरपालिका,महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावयाची असून त्यासाठी महाऊर्जाकडून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

४) वरील योजनेच्या अंमलबजावणी विषयीचा प्रगती अहवाल महाऊर्जा शासनास सादर करील.

५) उपरोक्त योजना राबविण्यासाठी महाऊर्जामार्फत आर्थिक तरतूद अर्थसंकल्पित होण्याकरिता कार्यवाही करण्यात येईल.

ड. <u>आर्थिक तरतूद –</u>

सदर योजना सन २०१०-११ पासून राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून, यासाठी होणारा खर्च " २८१०-वीज- अपारंपारिक ऊर्जा साधने "या मुख्य लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. दि. पारधी )
प्रभारी अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई.( पत्राने )
महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमर्शियल कॉम्पलेक्स, त्रिदलनगरसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६
प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय,मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

अप्पर मुख्य सचिव,( सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( नियोजन ), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( महसूल ),मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव( वने),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( वित्त), मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( उद्योग ), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ( आदिवासी ) मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव ( नगरविकास-२ ), मंत्रालय,मुंबई.
सचिव( ग्राम विकास ) मंत्रालय, मुंबई.
सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग),मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव ,मा. मंत्री( अपाऊ), मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री, मंत्रालय,मुंबई.
सर्व परवानाधारक कंपन्या.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व नगरपालिका/ महानगरपालिका.
मुख्य अभियंता ( विद्युत ) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत
३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर ( पूर्व), मुंबई-७१.
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य /विधान परिषद सदस्य.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती ( ऊर्जा-७ ) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.